# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीत
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. सुलक्ष्मी सुनील बाळगी

ओंकारातून निर्मिला आवाज
आवाजातून सुरांचे चढ उतार
सरगम ताल राग शब्द गीत
वेदांपासून उगम पूर्ण संगीत

नारद गाती ताल चिपळ्यात
वीणा धरी सरस्वती हातात
मधुर स्वर कृष्णाच्या बासरीत
लय नटेश्र्वराच्या तांडवात

गीत कोकीळरवात गुंजनात
ताल कोसळणाऱ्या जलधारांत
लय खळाळणाऱ्या प्रवाहात
नाद वाऱ्याच्या वेणुत पूर्ण संगीतात

कर्नाटकी अन् हिंदुस्थानी
भारतीय संगीतातील जुळ्या बहिणी
धृपद धमार ख्याल टप्पा
भावंडे मिळून मरिती गप्पा

लोकसंगीत बहीण कनिष्ठ
लोकप्रिय सर्व काळांत श्रेष्ठ
भजन, कव्वाली ठुमरी तीत
गरबा, रास, लावणी निश्चित

संगीत अंगाई आलाप विलापांत
अंतराळीय स्पंदन कंपन रेखांत
दिव्य भव्य सूक्ष्म अणूरेणुत
संगीत सामावले नाद ब्रम्हात

Anahat Music Therapy

# 'स्वरचित'- काव्य स्पर्धा

संगीत चिकित्सा बहु वापरात
मन अचींत मोकळे प्रसन्न करीत
उपयोगी गर्भ वाढ संस्कारात
अस्त्र शस्त्र शस्त्र मनोविज्ञानात

Anahat Music Therapy